# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## विधान भवन, नागपूर - ४४०००१

**विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत**
**नोंदणीकृत दक्षिणात्य पध्दतीच्या उपाहारगृह खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी**

## दरपत्रक

सन २०२४ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु होणार आहे. हिवाळी अधिवेशन कालावधीत खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी नोंदणीकृत (Registered) दक्षिणात्य पध्दतीच्या अल्पोपहाराची सेवा पुरविणाऱ्या प्रबंधकाकडून खाद्यपदार्थांचे नाव, दर, नग, वजन (ग्राममध्ये) दर्शवून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल, विधानभवन, मुंबई-४०० ०३२"** यांचे नावे दर्शवून **कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, नागपूर ४४० ००१'** यांच्याकडे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी. प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी कोणतेही दरपत्रक स्वीकृत अथवा अस्वीकृत करण्याचा अंतिम अधिकार सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी. दरपत्रकासंदर्भातील नियम व अटी संबंधीत अधिक माहितीसाठी या सचिवालयाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ पहावे.

**दिनांक :- ५ डिसेंबर, २०२४**

**विधान भवन,**
**नागपूर**

# विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत नोंदणीकृत दक्षिणात्य पध्दतीच्या अल्पोपहाराची सेवा पुरविणाऱ्या प्रबंधकाची नियुक्ती करण्यासाठी दरपत्रक नियम व अटी

सन २०२४ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी अधिवेशन नागपूर येथे प्रस्तावित असून अधिवेशन कालावधीत मा.सदस्यांकरीता दक्षिणात्य पध्दतीच्या अल्पोपहाराची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत प्रबंधकाकडून जाहिर दरपत्रक पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत असून त्याबाबतचे नियम व अटी खालीलप्रमाणे आहे.

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्तांकडून खाद्यपेय प्रबंधकांनी स्वत:च्या चारित्र्याविषयी, समाज विघातक प्रकरणात सहभागी नसल्याचे तसेच ते पोलीस विभागाकडे नोंदी असलेल्या आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाच्या गंभीर गुन्ह्याची नोंद नसल्याचे अद्ययावत प्रमाणपत्र सादर करावे व ते प्राप्त करण्यास विलंब लागत असल्यास तूर्त यासंदर्भात स्वत:चे शपथपत्र (Affidavit) सादर करावे व प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करुन घेऊन ते सादर करण्यात यावे. तसेच भागीदार असल्यास सर्व भागीदारांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र अथवा शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) उपाहारगृह संदर्भातील नोंदणी बाबतची कागदपत्र.

(३) दरपत्रक सादर करतांना दरपत्रकदार महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे रहिवाशी असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

(४) अन्न व औषधी द्रव्ये (FSSAD) प्रशासन विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(५) उपाहारगृहाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्याबाबतची कागदपत्रे.

.. २/-

(६) दरपत्रक सोबतच्या "परिशिष्ट "अ" मधील दरसूचीमध्ये दिलेल्या तक्त्यात खाद्यपदार्थांचे नाव, नग, वजन (ग्राममध्ये) दर्शवून दर भरुन सादर करावेत.

(७) यशस्वी निविदाकारास रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) अनामत रक्कम म्हणून डी.डी. च्या स्वरुपात "कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय" यांच्या नावे जमा करावी लागेल.

(८) सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, नागपूर"** यांच्याकडे **दिनांक ११ डिसेंबर, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत द्यावीत.

(९) दरपत्रक स्वीकृत/अस्वीकृत करण्याबाबतचे सर्व अधिकार सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे असतील.

# परिशिष्ट "अ"

## दरपत्रकासोबत सादर करावयाची खाद्यपदार्थाची सूची व दर

| अ.क्र. | | पदार्थाचे नाव | नग | पदार्थाचे वजन ग्राम | दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | | **नाश्ता** | २ नग | १५० | |
| | १. | स्टीम इडली | २ नग | २०० | |
| | २. | इडली सांबार | २ नग | २०० | |
| | ३. | वडा सांबार | २ नग | २०० | |
| | ४. | बटाटा वडा | २ नग | २०० | |
| | ५. | दही वडा | २ नग | १५० | |
| | ६. | व्हेज समोसा | २ नग | २०० | |
| | ७. | पंजाबी समोसा | २ नग | १५० | |
| | ८. | व्हेजीटेबल कटलेट | १ प्लेट | १५० | |
| | ९. | उपमा | १ प्लेट | १५० | |
| | १०. | कांदा, बटाटा पोहे, | १ प्लेट | २०० | |
| | ११. | टोमॅटो ऑमलेट | १ प्लेट | १५० | |
| | १२. | मिसळ, | १ प्लेट | १५० | |
| | १३. | शिरा गोड | १ प्लेट | १५० | |
| | १४. | भजी | १ प्लेट | २०० | |
| | १५. | उत्तप्पा | १ प्लेट | २०० | |
| | १६. | ओनियन उत्तप्पा | १ प्लेट | १५० | |
| | १७. | साधा डोसा | १ प्लेट | २५० | |
| | १८. | मसाला डोसा | १ प्लेट | १०० | |
| | १९. | पेपर साधा डोसा | १ प्लेट | २५० | |
| | २०. | पेपर मसाला डोसा | १ प्लेट | १५० | |
| | २१. | रवा साधा डोसा | १ प्लेट | २५० | |
| | २२. | रवा मसाला डोसा | १ प्लेट | १५० | |
| | २३. | मैसूर साधा डोसा | १ प्लेट | २०० | |
| | २४. | मैसूर मसाला डोसा | १ प्लेट | १५० | |

.. २/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(१)** | | **चहा** | | | |
| **(२)** | | **कॉफी** | | | |
| **(३)** | | **दही किंवा ताक** | | | |

**दरपत्रकदाराची सही व शिक्का**